माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४०९/२०२२**

**अपिलार्थी, श्री. कुसमाकर मुरलीधर बेदरे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय, साकोली, ता. साकोली, जि.भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,**
साकोली, ता. साकोली, जि.भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२१ | २२.११.२०२१ | ०६.१२.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २०.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दि. २९.०६.२०२१ ला भुसंपादन अधिकारी यांचे कार्यालयात केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही किंवा चौकशी करण्यात आली, त्याबाबत तपशिलाची प्रत मिळणेबाबत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या वतीने दिनांक २२.११.२०२१ रोजी प्रतिसाद देण्यात आलेला असून अपिलार्थी यांनी केलेली मागणी ही नियमाअंतर्गत नसल्यामुळे त्यावर विचार करता येत नाही, असे सुचीत केले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "पत्राची दखल घेण्यात आली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १०.०२.२०२२ रोजी** " मागितलेली माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत प्रतिसाद देण्यात आलेला असून अपिलार्थी यांनी केलेली मागणी ही नियमाअंतर्गत नसल्यामुळे त्यावर विचार करता येत नाही, असे सुचीत केले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नही. तद्नंतर अपिलार्थी यांनी प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज दाखल केला आहे. प्रस्तूत प्रकरणी जोडपत्र-अ मध्ये नमूद दिनांक २९.०६.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जावर भुसंपादन अधिकारी कार्यालयाच्या वतीने सुयोग्य व संयुक्तिक प्रतिसाद दिलेला असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०४.२०२४**

जावक क्रमांक ६४८४ दिनांक 24 SEP 2024